# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.05.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- पाकिस्तानच्या व्यापार, जहाज आणि टपाल सेवांवर तत्काळ प्रभावानं बंदी लागू
- भारताकडून अंगोलाला दोनशे दशलक्ष डॉलर्सचे संरक्षण कर्ज
- देशातल्या पाच हजार केंद्रांवर आणि परदेशात 13 शहरांमध्ये पात्रता परीक्षेचं आयोजन
- वेव्हज् 2025 चा आज समारोप, आयआयसीटीबरोबर सात जागतिक कंपन्यांचे सामंजस्य करार
  आणि
- खेलो इंडियाच्या सातव्या आवृत्तीला आजपासून सुरुवात.

**पहलगाम पाकबंदी**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभुमीवर,भारतानं पाकिस्तानमधून सर्व वस्तूंच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आयातीवर तत्काळ प्रभावानं बंदी घातली आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयानं काढलेल्या अधिसूचनेत याविषयी निर्देश देण्यात आले आहेत.पाकिस्तानातून निर्यात होणाऱ्या सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक तत्काळ प्रभावाने प्रतिबंधित केली जाईल. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हे निर्बंध लादण्यात आले. या निर्बंधांमध्ये सवलत किंवा अपवादासाठी सरकारची मान्यता लागेल. तसंच पाकिस्तानच्या जहाजांना भारतीय बंदरांवर प्रवेशबंदी घातली आहे. तसंच भारतीय जहाजांनाही पाक बंदरात जाण्यास मनाई केली आहे. जहाजबांधणी महासंचालनालयानं जारी केलेल्या निवेदनात, पाकिस्तान ध्वज असलेल्या कोणत्याही जहाजाला भारतीय बंदरात प्रवेशास परवानगी दिली जाणार नाही. तर भारतीय जहाजांना पाकिस्तानच्या बंदरात प्रवेशास बंदी असेल. हे निर्बंध तत्काळ प्रभावाने आणि पुढील आदेशापर्यंत लागू करण्यात आले आहेत. भारतीय मालमत्तेची, मालवाहतुकीची आणि पायाभूत सुविधांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तसं सार्वजनिक हितासाठी आणि भारतीय जहाजबांधणीच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आदेशातून सवलत किंवा मुभा देण्याचा निर्णय त्या त्या प्रकरणांनुसार घेतला जाईल असं संचालनालयाने काढलेल्या निवेदनात म्हटलं आहे.
तसंच भारताने पाकिस्तानला जाणाऱ्या आणि येणाऱ्या सर्व टपाल सेवा देखील बंद केल्या आहेत.

**राष्ट्रपती मुर्मू**

सर्व अफ्रिकन राष्ट्रांशी शाश्वत आणि परस्पर फायदेशीर ठरणाऱ्या भागीदारीसाठी भारत वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. अंगोलाचे अध्यक्ष जोआओ लॉरेन्को यांनी काल राष्ट्रपती भवनात मुर्मू यांची भेट घेतली. अंगोलासह अफ्रिकन देशांशी भारताची विशेष मैत्री असल्याचं नमूद करताना अफ्रिकेत शांतता, सुरक्षा आणि स्थिरता राखताना अंगोलानं पार पाडलेल्या महत्त्वाच्या भुमिकेचं राष्ट्रपतींनी कौतुक केलं. दहशतवाद हे मानवतेसमोरील संकट असून त्याचा सर्वच प्रकारे निषेध केला पाहिजे असं सांगून अंगोलाचे राष्ट्रपती लॉरेन्को यांनी पहलगाम हल्ल्यासंदर्भाने भारताला दिलेल्या पाठिंब्यासाठी आभार मानले. या बैठकीदरम्यान उभय देशांच्या नेत्यांनी नागरीकांच्या प्रगती आणि कल्याणासाठीच नव्हे तर सर्वच विकसित देशांच्या प्रगतीसाठी एकत्रित काम करत राहाण्यावर सहमती दर्शवली.

**पीएम अंगोला**

तत्पुर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अंगोलाचे राष्ट्राध्यक्ष लॉरेन्को यांच्या प्रतिनिधीमंडळ पातळीवरील चर्चा झाली. त्यानंतर अंगोलाच्या सशस्त्र दलांच्या आधुनिकीकरणाला पाठिंबा देण्यासाठी भारताने 200 दशलक्ष डॉलर्सचे संरक्षण कर्ज देण्याची घोषणा करण्यात आली. बैठकीनंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत, पंतप्रधान मोदी यांनी दहशतवाद आणि त्याच्या समर्थकांवर कठोर कारवाई करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेवर भर दिला. तसंच सीमापार दहशतवादाचा सामना करण्यासाठी अंगोलानं दर्शवलेल्या एकजुटीविषयी लॉरेन्को यांचे आभार मानले. या बैठकीनंतर, परराष्ट्र मंत्रालयाचे आर्थिक संबंध सचिव दम्मू रवी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना संरक्षण कर्जाचा पुनरूच्चार करत, भारतीय सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील कंपन्यांशी चर्चा सुरू असल्याचं सांगितलं. उभय देशांनी शेती, पारंपारिक औषध आणि संस्कृतीसह विविध क्षेत्रात अनेक करारांची देवाणघेवाण केल्याची माहितीही रवी यांनी दिली.

**अमित शहासहकार आढावा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल दिल्लीत राष्ट्रीय सहकारी निर्यात मर्यादित म्हणजे एनसीईएल, राष्ट्रीय सहकारी ऑरगॅनिक मर्यादित म्हणजेच एनसीओएल आणि भारतीय बीज सहकारी समिती मर्यादित या संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेणारी उच्चस्तरीय बैठक पार पडली. 2023 मध्ये सहकारी निर्यात, सेंद्रीय उत्पादने आणि दर्जेदार बियाण्यांच्या प्रसारासाठी मातृ संस्था म्हणून काम करण्याच्या उद्देशांने तीन राष्ट्रीय सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आल्याचं शहा यांनी यावेळी सांगितलं. भारतातून सध्या निर्यात न होणाऱ्या तीन नव्या आणि विशिष्ट उत्पादनांवर लक्ष केंद्रीत करण्याची सूचना करतानाच, गृहमंत्र्यांनी एनसीएएलसमोर निर्यातीसाठी दोन कोटी रुपयांचं महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. या बैठकीत डाळींच्या आयातीसाठी आफ्रिका आणि म्यानमारमध्ये एनसीईएल कार्यालये स्थापन करण्याची सूचना केली. तसंच जागतिक मागणी समजून घेत पुरवठा क्षमता सामायिक करण्यासाठी एक समर्पित संकेतस्थळ विकसित करण्याचा प्रस्ताव मांडला.

**चाचणी नीट**

राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या एनटीए वतीनं आज देशातील पाच हजार केंद्रावर आणि परदेशातील 13 शहरांमध्ये राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा अर्थात नीट 2025 होणार आहे. संस्थेनं जारी केलेल्या निवेदनात परीक्षेसाठी सर्व तयारी पूर्ण झाली असून या परीक्षेसाठी साडेबावीस लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. यासाठी काल सर्व केंद्रांवर सराव पार पडला.

**वेव्ज-करार**

WAVES शिखर परिषद एक नव्या युगाची नांदी असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुंबईत आयोजित वेव्हज परिषदेत काल सांगितलं. अनेक जागतिक कंपन्यांनी या संदर्भात भारतासोबत काम करण्याची तयारी दर्शविली असून गुगल, मेटा आणि मायक्रोसॉफ्टसह सात जागतिक कंपन्यांनी वेव्हज परिषदेदरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसोबत सामंजस्य करार केला. आज या परिषदेची सांगता होत आहे.

**वेव्ज-करे**

वेव्हज परिषदेत काल कम्युनिटी रेडिओ संदर्भातील सत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल मुरुगन यांच्या हस्ते त्याचं उद्घाघटन झालं. दहाव्या राष्ट्रीय कम्युनिटी रेडिओ पुरस्कारांचं वितरण मुरुगन यांच्या हस्ते यावेळी झालं. नवोन्मेष श्रेणीत सांगली जिल्ह्यातल्या येरळा वाणी या कम्युनिटी रेडिओला राष्ट्रीय पातळीवर पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. कम्युनिटी रेडिओच्या देशभरात सुरु असलेल्या कार्याची, त्यांनी प्रशंसा केली आहे. सांगली जिल्ह्यातल्या जत तालुक्यातील जालिहाळ बुद्रुक आणि परिसर या येरळाच्या प्रकल्प विभागात येरळा वाणी ऐकू येते. या भागात होणारी लहान वयातील लग्नं, मुलगाच हवा यासाठी केली जाणारी एकापेक्षा जास्त लग्नं या विषयावरील कथा नाट्य रूपांतरित करून स्पर्धेसाठी येरळा वाणीनं पाठवली होती.

**रेल्वे**

पुण्यातील रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण कायापालट करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. या अंतर्गत चार नवीन फलाटांची उभारणी आणि जागतिक दर्जाची डिजिटल यंत्रणा स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुण्यात दिली. हडपसर इथून सुरू होणाऱ्या हडपसर–जोधपूर एक्सप्रेस आणि एमजीआर चेन्नई सेंट्रल–भगत की कोठी एक्सप्रेस गाड्यांचा आरंभ करताना वैष्णव बोलत होते. वैष्णव यांनी सांगितलं की, पुणे, हडपसर, खडकी, शिवाजीनगर, उरळी कांचन आणि आळंदी या सहा स्थानकांचा विकास आराखडा अंतिम टप्प्यात आहे. पुणे–नाशिक मार्गावर देखील नवीन ट्रॅकच्या चाचण्या सुरू आहेत. पुणे–लोणावळा मार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकचं काम लवकरच पूर्ण होईल अशी माहिती त्यांनी दिली.

**चारधाम यात्रा**

भारतीय रेल्वेने चार धाम यात्रेसाठी भारत गौरव डिलक्स रेल्वेगाडी सुरू केली आहे. ही गाडी बद्रीनाथ, जोशीमठ, ऋषिकेश, पुरी, कोणार्क, रामेश्वरम , द्वारका या स्थळांबरोबरच काशी विश्वनाथ, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर आदी धार्मिक स्थळांवरही जाणार आहे.या दरम्यान ही गाडी एकंदर 8 हजार 425 किलोमीटरचा प्रवास करणार आहे. दिल्लीच्या सफदरजंग रेल्वे स्थानकावरून ही विशेष रेल्वे 27 तारखेला सुटेल आणि 17 दिवसांत देशातील चारही धाम आणि इतर धार्मिक स्थळांची यात्रा पूर्ण करेल.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया युथ गेम्स 2025 च्या सातव्या आवृत्तीला आजपासून बिहार राज्यातल्या पाच शहरांमध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेत पाच हजार खेळाडू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. यातील नेमबाजी, जिम्नॅस्टिक्स आणि ट्रॅक सायकलिंगचे आयोजन दिल्लीत होणार आहे, तर उर्वरित स्पर्धा बिहारमध्ये होतील.

**आयपीएल**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल अत्यंत चुरशीच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं काल चेन्नई सुपर किंग्ज संघाचा 2 धावांनी पराभव केला. बंगळुरूने जेकब बेथल, विराट कोहली आणि रोमारिओ शेफर्ड यांच्या अर्धशतकांच्या जोरावर 213 धावा केल्या. चेन्नईकडून आयुष म्हात्रेने 94 तर रवींद्र जडेजानं 77 धावा केल्या.

आयएमडी हवामान

ओडिशामध्ये आज मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान शास्त्र विभागानं  वर्तवला आहे. तसंच बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये मेघगर्जनेसह पावसाची आणि वेगानं वारं वाहण्याची शक्यता वर्तविली आहे. मध्य प्रदेश, विदर्भ आणि छत्तीसगडमध्ये मंगळवारपर्यंत मेघगर्जनेसह, मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.9 मेपर्यंत वायव्य आणि ईशान्य भारतात हीच स्थिती राहील, असा अंदाज हवामान खात्यानं  वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**